**प्रेस नोट दि.११/०५/२०१९**

**लष्कर पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**गहाळ झालेली सुटकेस परत ताब्यात दिले बाबत**

लष्कर पोलीस स्टेशन अंकीत चारबावडी पोलीस चौकी येथे दिवसपाळी ड्युटीस असणारे ड्युटी अंमलदार पो.हवा.एक्के व पो.ना.७२५ मुलाणी यांना ड्युटी असताना दि.०८/०५/२०१९ रोजी १७/०० एक रिक्षा चालक नामे राजेंद्र तुकाराम दाभाडे यांनी त्यांच्या रिक्षात राहीलेली  एक काळ्या रंगाची सुटकेस चारबावडी पोलीस चौकी येथे आणुन दिली त्यानंतर त्या सुटकेसच्या आतील कागदपत्रांवरून पोलीस उप निरीक्षक जी.बी.कुलाळ पो.हवा.एक्के व पो.ना. मुलाणी यांनी तपास केला असता सदरची सुटकेस ही ॲडव्होकेट गणेश इंगळे रा.खामगाव जिल्हा बुलढाणा यांची असल्याचे निष्पन्न झाले त्यावेळी ॲड.गणेश इंगळे यांना चौकीस बोलावुन काळ्या रंगाची सुटकेस दाखविली असता ॲड.इंगळे यांनी ती सुटकेस माझीच बॅग आहे त्यामध्ये शिवाजीनगर कोर्ट व मुंबई हायकोर्टाची महत्त्वाची कागदपत्रे आहेत.ती सुटकेस ॲड.इंगळे यांचीच आहे याची खात्री करून पो.हवा.एक्के व पो.ना.मुलाणी यांनी सदरची सुटकेस ॲड.गणेश इंगळे यांचे ताब्यात दिली.

